नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०१/२०२६ (शनिवार )

---

# पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक प्रतिबंधीत नायलॉन मांजा वापरून पतंग उडविणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

## ९ नग नायलॉन मांजा चक्रीसह ५ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक ०९/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा वापरून पतंग उडविणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालील प्रमाणे ०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोस्टे कन्हान :-** कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन नायलॉन मांजाबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्यावरून **शुभम भोजराज गोंडाणे, वय ३२ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ, पिपरी कन्हान** हा त्याचे घराचे गच्ची वर नॉयलॉन मांजाचा वापर करून पतंग उडवितांना मिळुन आल्याने पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ८०० /- रूपये जप्त करण्यात आला. तसेच आरोपी नामे **प्रयास अनिल खेवले, वय १९ वर्ष, रा. महालगाव कापसी, नागपूर हमु. वार्ड क्रं ०७ पिपरी कन्हान**, हा मौजा टेकाडी येथील हनुमान मंदीर जवळील मागील बाजुस मैदानात नॉयलॉन मांजानी पतंग उडवितांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ५०० /- रूपये जप्त करण्यात आला. आरोपीतांवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोस्टे कोंढाळी :-** कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कोंढाळी येथे **पंकज अजाब सरोदे, वय ४० वर्ष, रा. कोंढाळी** हा नॉयलॉन मांजाचा वापर

करून पतंग उडवित आहे. नमुद आरोपी हा नॉयलॉन मांजाचा उडवितान मिळुन आल्याने पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून २ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ६०० /— रूपये जप्त करण्यात आला.

**पोस्टे काटोल :—** काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अण्णाभाउ साठे नगर काटोल,येथे **यश मुकेश कावळे, वय २० वर्ष, रा. अण्णाभाउ साठे नगर काटोल**,याचेकडे प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करीता आणलेला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीचे दुकानात प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला ३ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती २४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोस्टे एमआयडीसी बोरी :—** एमआयडीसी बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **विशेष देवीदास मेश्राम, वय १९ वर्ष, रा. वार्ड क्र १. केदार कॉलनी टेभरी. ता. हिंगना, जि. नागपुर**, हा मौजा टेभंरी येथे नायलॉन मांजानी पतंग उडवित आहे. मिळालेल्या माहीतीच्या पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता नमुद **आरोपी हा नायलॉन** मांजानी पतंग उडविताना मिळुन आला. पंचासमक्ष ३ नगर नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती १४५० /— रूपये जप्त करण्यात आला. नायलॉन मांजा कुठुन आणाल्याबाबत विचारपुस केली असता **आरोपी नामे विजय महादेवराव डबुरकर, वय ५५ वर्षे रा वार्ड क्र ३, टाकळघाट, ता. हिंगना, जि नागपुर** याचे दुकानातुन विकत आणल्याची माहीती दिली. दोन्ही आरोपीतांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**वर नमुद आरोपीतांनी नॉयलॉन मांजा पर्यावरणास तसेच जिवतीस धोकादायक असुन शासनाव्दारे प्रतिबंधित केला असतांना सुध्दा स्वत:च्या मौजमजेसाठी तसेच आर्थिक फायदयासाठी नायलॉन मांजा विक्री साठी तसेच पतंग उडविण्यासाठी वापर केल्याने नमुद आरोपीविरूध्द कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये ०५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वरील कारवाईमध्ये एकुण ९ नग नायलॉन मांजा चक्री किंमती ५,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

# धान चोरी करणाऱ्या ४ आरोपीच्या टोळीला अटक
# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी
# वहनासह ६९ धानपोते, ७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कन्हान :—** पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत फिर्यादी नामे राजेश आनंदराव चरडे, वय ४५ वर्ष, रा. निलज खंडाळा यांचे निलज शिवारातील शेतात धानाची लागवड केली असून त्यांच्या शेतातुन ६७ बोऱ्या धान दिनांक ०४/०१/२०२६ रोजी बोऱ्या सिलाई मारून शेतात ठेवले व दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी शेतात येवून पाहीले असता कोणीतरी अज्ञात इसमांनी त्याचे शेतात ठेवलेले ६७ धानाचे बोरी पैकी १६ बोरी धान चोरून नेल्याचे दिसून आल्याने पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सदर गुन्ह्याचे समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी सुरू केला. नमुद पथकाने गुप्त बातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे सदर गुन्हयात महिन्द्रा पिकअप एम एच—४०/बी एल—६५५३ चा वापर करण्यात आल्याचे निष्पन्न केले. सदर वाहनाचा तपास केला असता सदर वाहन पोलीस स्टेशन मौदा अतंर्गत येणाऱ्या मौजा धानला येथील रोहन गेंदलाल किरपान याचे असल्याचे समजले. पोलीसांनी रोहन किरपान याला विचारपुस केली असता त्याने रोहीत तिरबुडे ,रा धानला याला २ महिन्यापासुन नमुद वाहन चालविण्यास दिले असल्याची माहीती प्राप्त झाली. प्राप्त माहीती वरून दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सदर गुन्हयातील आरोपी **१) देवानंद गणपत तिरबुडे, वय ३२ वर्ष, २) रोहीत रमेश तिरबुडे, वय २२ वर्ष, ३) मुकेश कुसाराम बावने, वय २८ वर्ष, तिन्ही रा. धानला, ता. मौदा, जि. नागपूर ४) निखील ओमप्रकाश बोंदरे, वय २६ वर्ष, रा. वार्ड नं. ८, ढिवर मोहल्ला, मौदा** यांना ताब्यात घेवून त्यांना सविस्तर विचारपुस केली असता चारही आरोपीतांनी १) निलज खंडाळा परिसरातून १९ पोते धान, २) अरोली, कोदामेंढी परिसरातून २९ पोते धान ३) नेरी, उनगाव,सोनेगाव(नागपुर शहर)परिसरातून १३ पोते धान ४) केसोरी अंबाडी,पोलीस स्टेशन मौदा परिसरातुन ०३ पोते धान ५) आंजनगाव धामनगाव पोलीस

स्टेशन मौदा परीसरातून ०५ पोते धान नमुद पिकअप मधुन सर्वांनी मिळुन चोरी केल्याचे सांगितले.

**आरोपीतांकडुन एकुण ६९ पोते धान किंमती १,७२,५००/—रूपये, महिन्द्रा पिकअप एमएच ४० बीएल ६५५३ किमती ५,००,०००/— रूपये मोबाईल किमती ३०,०००/— रूपये व नगदी ९५०/—रूपये असा एकुण ७,०३,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वर नमुद ४ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०९ गोवंश जनावरांची सुटका, कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०९/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी सदर वाहन शोध कामी पेट्रोलींग केली असता तारसा रोड वरील नागपुर जबलपुर मार्ग कन्हान येथे एक संशयीत अशोक लेलॅड बडा दोस्त कंपनीचे चारचाकी वाहन क्र. एम. एच. २७ बि. एक्स ८९६० हे वाहन दिसुन आले. पोलीसांना पाहुन सदर वाहन चालकाने

त्याचे वाहन पळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संशय अधिक बळावल्याने पोलीसांनी नमुद वाहनाचा पाठलाग करून आरोपी वाहन चालक **आसीफ मोसीन कुरेशी, वय ३५ वर्षे, रा. परवेश नगर, पिली नदी, नागपुर हा** याला शिताफिने पकडले. दुसरा इसम हा पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०९ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून अशोक लेलॅंड बडा दोस्त कंपनीचे चारचाकी वाहन क्र. एम. एच. २७ बि. एक्स ८९६० किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०९ गोवंश जनावरे किंमती २,२५,०००/— रूपये असा एकुण किंमती ६,२५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी वाहन चालक आरोपी १) आसीफ मोसीन कुरेशी, वय ३५ वर्षे, रा. परवेश नगर, पिली नदी, नागपुर पाहीजे आरोपी नामे २) बडा बुल्ली, कामठी, नागपूर ३) नियाज कुरेशी, दोन्ही रा. बकरा का मेला, कामठी, नागपुर यांचेविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी चालक यास अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनांसह २० लाख १५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,२ आरोपी अटक बेला पोलीस आणि महसुल विभाग यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०८/०१/२०२६ रोजी पिपरा येथील तलाठी यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पिपरा शिवारात अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे बेला पोलीसांनी महसुल विभागा सोबत संयुक्तरीत्या कारवाई करत मौजा पिपरा शिवार येथे टाटा कंपनीचे टिप्पर क्र. एम एच ४९ बी झेड ५८२९ हे वाहन दिसुन आले. वाहनात रेती आढळुन आली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद** टाटा कंपनीचे टिप्पर क्र. एम एच ४९ बी झेड ५८२९

किंमती २०,००,०००/—रूपये आणि एकुण ०३ ब्रास रेती किंमती १५,०००/— रूपये असा एकुण २०,१५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी क्र. १) अरविंद अशोकराव कोटनाके, वय ३० वर्षे, रा. रामनगर, ता. समुद्रपूर जि. वर्धा (चालक) आणि त्याचा साथीदार २) नितेश मोहनराव कुडे, वय २९ वर्षे, रा. हळदगाव, ता. समुद्रपूर जि. वर्धा यांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.



# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १०/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७४५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९९  रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १६६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने